श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे न्यासाचे विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामकाजाचे सनियंत्रण व पारदर्शकता वाढवण्यासाठी कर्मचारी व्यवस्थापन प्रणाली ( Employee Management System Software ) **<u>खरेदी करणेकामी खालील अटी व शर्ती -</u>**

१. सॉफ्टवेअर प्रणालीचा आवश्यक तपशील

| अ.क्र. | मॉड्युल / वैशिष्ट्ये | आवश्यक तपशील |
|---|---|---|
| १ | कर्मचारी डेटाबेस | कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती, पदे, विभाग, फोटो, वारसदार आणि कागदपत्रे (नोटीस, मेमो, प्रशस्तीपत्र) डिजीटल संचयित करणे, |
| २ | बायोमॅट्रीक एकत्रीकरण | देवस्थानकडे सध्या उपलब्ध असलेल्या बायोमेट्रीक / फेस रीडर मशिनशी हे सॉफ्टवेअर जोडणे. |
| ३ | हजेरी व रजा व्यवस्थापन | दैनंदिन हजेरी, उशिरा येणे, ओव्हर टाईम, विविध रजांचे (CL, ML, EL) ऑनलाईन ट्रॅकिंग |
| ४ | पे-रोल आणि वेतन व्यवस्थापन | मासिक पगार पत्रक निर्मिती, PF, PT,TDS, इतर कपातीची स्वयंचलित व अचूक गणना, उपदान, रजा रोखीकरण, कालबद्ध पदोन्नती, पदावनती, विविध फरक बिले तयार करणे. |
| ५ | शिफ्ट आणि ड्युटी रोस्टर | सण-उत्सव आणि गर्दीच्या काळात कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या शिफ्टसचे सुलभ नियोजन करणे. |
| ६ | मोबाईल ॲप / यूझर पोर्टल | कर्मचाऱ्यांसाठी पगार पत्रक, रजेचे अर्ज, ऑनलाईन पाहण्याकरिता सुरक्षित लॉगिन/ ॲप सुविधा |
| ७ | अहवाल आणि डॅशबोर्ड | व्यवस्थापनासाठी विविध प्रकारचे मासिक, त्रैमासिक, वार्षिक अहवाल एका क्लिकवर जनरेट करणे. |

२. श्री मोहटादेवी संस्थान हे धर्मादाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेची विनंती.

३. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

४. कर्मचारी व्यवस्थापन प्रणाली ही फक्त सॉफ्टवेअर प्रणाली खरेदीसाठी आहे. कोणत्याही प्रकारच्या हार्डवेअर उपकरणांचा यात समावेश नाही.

५. शासनाचे वेतन आयोगानुसार वेळोवेळी होणारे वेतनातील बदल, फरक बिले इ. अचुक गणना करून देणे बंधनकारक आहे.

६. देवस्थानच्या विद्यमान हजेरी उपकरणांशी (Biometric Devices ) सॉफ्टवेअर यशस्वीरित्या कनेक्ट करून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

७. देवस्थानच्या सर्व विद्यमान आणि भविष्यात वाढणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हे सॉफ्टवेअर अमर्याद किंवा किमान युजर्ससाठी चालणारे असावे.

८. पुरवठादार संस्थेकडे / कंपनीकडे वैध जीएसटी नोंदणी आणि पॅन कार्ड असणे अनिवार्य आहे.

९. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट किंवा अशा प्रकाराच्या प्रणाली शासकीय / निमशासकीय किंवा देवस्थानला पुरवल्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा ( अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.)

१०. सादर केलेल्या दरांमध्ये सॉफ्टवेअर लायसन्स, इन्स्टॉलेशन, कर्मचाऱ्यांचे ट्रेनिंग आणि १ वर्षाचा मोफत तांत्रिक सपोर्ट व देखभाल ( AMC ) समाविष्ट असावे.

११. सॉफ्टवेअरचा डेटा पुर्णपणे ससुरक्षित आणि क्लाऊड सर्व्हरवर ( Daily cloud Backup सह ) स्वयंचलित बँकअप घेण्याची व्यवस्था पुरवठादाराने करणे बंधनकारक राहील.

१२. सॉफ्टवेअर चालवताना काही अडचण किंवा एरर(Bug) आल्यास, विक्रेत्याने २४ तासांच्या आत ऑनलाईन किंवा ऑफलाईन सपोर्ट देऊन ती सोडवणे बंधनकारक आहे.

१३. डेटाची मालकी- देवस्थानच्या कर्मचाऱ्यांचा संपूर्ण डेटा,पगार अ ाणि वैयक्तिक माहिती यावर संपूर्ण आणि एकमेव मालगी हक्क श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे न्यासाचाच राहील.

१४. विक्रेता हा डेटा स्वतःकडे साठवून ठेवू शकत नाही किंवा कोणत्याही तिसऱ्या कंपनीला व्यावसायीक वापरासाठी विकू शकत नाही. विक्रेत्याच्या चुकीमुळे किंवा सर्व्हरच्या कमकुवत सुरक्षेमुळे डेटा लीक झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर आणि आर्थिक जबाबदारी विक्रेता कंपनीची राहील.

१५. सॉफ्टवेअरमधील डाटा देवस्थानचे पुर्वीचे वापरात असलेल्या सॉफ्टवेअरमध्ये मॉयग्रेट करून दिला पाहिजे.

१६. विक्रेता, पुरवठादार यांनी भारताच्या डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, २०२३ तसेच वेळोवेळी लागू असणाऱ्या कायद्यांस अनुसरून मधील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१७. सॉफ्टवेअरमध्ये कोणी, कधी, कोणत्या कॉम्प्यूटरवरून आणि काय बदल केला, याची संपूर्ण नोंद ठेवणारी ऑडीट लॉग सिस्टीम असावी, यामुळे डेटाशी छेडछाड झाल्यास मुळ व्यक्तींचा शोध घेता येईल.

१८. पुरवठादार यांचेकडून सेवा पुरविणेबाबत करारनामा करून द्यावा लागेल.

१९. संस्थानकडून पुरवठा आदेश दिलेनंतर १ महिण्यात सदरचे काम पूर्ण करून द्यावे लागेल. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो पाथर्डी कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

२०. सिलबंद पाकीटात दरपत्रक संस्थानचे आवक विभागामध्ये विहीत मुदतीत जमा करावेत. पाकीटावर कर्मचारी व्यवस्थापन प्रणाली दरपत्रक (सर्वमावेशक) असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे